## जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
### (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्र.०२४७२-२२७३०१ Email id:- rdc1osmanabad@gmail.com फॅक्स क्र.०२४७२-२२८०३८

संदर्भ:- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
२. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७
३. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४
४. महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम २०२०
५. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५दिनांक १४ मार्च २०२०
६. महाराष्ट्र महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांची अधिसूचना दिनांक १३/०४/२०२०
७. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DISM-१/ दिनांक १३/०४/२०२०
८. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र.४०/-३/२०२०-डीएम-१ (ए) दिनांक १४ /०४/ २०२०
९. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र.४०/-३/२०२०-डीएम-१ (ए) दिनांक १५ /०४/ २०२०
१०.या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दिनांक १५/०४/२०२०
११.महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, यांचे आदेश क्रमांक अधिसूचना क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DISM-१/ दिनांक १७/०४/२०२०
१२. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, यांचे आदेश क्रमांक अधिसूचना क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DISM-१/ दिनांक ०२/०५/२०२०

---

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दि.०४/०५/२०२०

**विषय:-** उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**आदेश:-**

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक १ अन्वये जिल्हाधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजारावर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्रमांक १२ अन्वये महाराष्ट्र शासनाचे आदेशानुसार राज्यामध्ये दिनांक ०४ मे, २०२० पासून दिनांक १७ मे, २०२० पर्यंत लॉकडाऊन वाढविण्यात आला आहे. सदर लॉकडाऊन कालावधीत उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणूचा प्रादुर्भाव (कोव्हिड १९) रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणूचा प्रादुर्भाव (कोव्हिड १९) रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी रोखण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयातील सर्व दुध केंद्रे, भाजीपाला केंद्रे व भाजीपाला फिरते विक्रेते, कृषी विषयक बि-बियाणे, खते केंद्रे व कृषी अवजारे, स्पेअरपार्टसची दुकाने व इत्यादी सर्व खाजगी आस्थापना या ठराविक कालावधीतच चालु ठेवणे आवश्यक आहे.



Scanned with CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ- मुंडे, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण उस्मानाबाद उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणूचा प्रादुर्भाव (कोव्हिड १९) रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून उस्मानाबाद जिल्हयातील खालीलप्रमाणे आस्थापना नमुद कालावधीत चालु ठेवण्याबाबत आदेशीत करीत आहे.

१. भाजीपाला, किराणा दुकाने व सर्व आस्थापना सोमवार, बुधवार व शुक्रवार या दिवशी सकाळी ०८.०० ते दुपारी ०१.०० या कालावधीत चालू राहील.
२. दुध, बि-बियाणे, खते, यांची दुकाने संपुर्ण आठवडाभर चालु राहतील.
३. हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये लोकांना बसता येणार नाही. हॉटेल, रेस्टॉरंट संपुर्ण आठवडाभर चालु राहतील. त्यामध्ये किचन, होम डिलिव्हरी व पार्सल सेवा चालु राहतील.
४. पानटपरी व तंबाखु दुकाने बंद राहतील.
५. अमृततुल्य / चहाची दुकानामध्ये ग्राहकांना बसता येणार नाही. त्यांना युज अॅन्ड थ्रो चे कप वापरता येतील. तसेच पार्सल सेवा देता येईल.
६. दुकानदारांनी त्यांच्या आस्थापनातील कर्मचा-यांसह मास्क / स्वच्छ रुमाल/ सॅनिटायझर /हॅन्डग्लोज / गॉगलचा वापर करणे बंधनकारक राहील.
७. ग्राहकांनी देखील दुकानामध्ये मास्क / स्वच्छ रुमाल / सॅनिटायझर /हॅन्डग्लोज /गॉगलचा वापर करणे बंधनकारक आहे.
८. दुकानदारांनी त्यांचे दुकानासमोर ग्राहकांची गर्दी होणार नाही, या दृष्टीने बॅराकेडींग करणे आवश्यक आहे. तसेच ग्राहकांना दुकानाचे काऊन्टरचे बाहेरुनच वस्तुंची डिलीव्हरी देणे बंधनकारक आहे.
९. ग्राहकांनी त्यांचे रहिवासाचे क्षेत्रातील दुकानातूनच वस्तुंची खरेदी करावी.
१०. दुकानदारांनी ग्राहकांना आगाऊ मागणी (प्रिबुकींग) करण्यासंदर्भात प्रोत्साहीत करावे व ग्राहकांना होम डिलीव्हरीसाठी प्राधान्य द्यावे.
११. सर्व आस्थापना सोमवार, बुधवार व शुक्रवार सकाळी ०८.०० ते ०१.०० या कालावधीत सुरु राहतील. त्यांनी ग्राहकांकडून फोन बुकींग करुन घेवून होम डिलीव्हरी देण्यास प्राधान्य द्यावे.
१२. सर्व प्रकारच्या अत्यावश्यक / अत्यावश्यक नसलेल्या वस्तुंच्या पार्सल सेवेला परवानगी राहील.
१३. सर्व दुकानदार / ग्राहकांनी आरोग्य सेतू अॅपचा वापर करावा.
१४. औषधी दुकाने २४ तास सुरु राहतील.
१५. केश कर्तनालय/ सलूनची दुकाने बंद राहतील परंतु ते घरी जाऊन सेवा देऊ शकतील.
१६. ई-कॉमर्स, कुरिअर व पार्सल सेवा सुरु राहतील.
१७. बँका/पतसंस्था/ सर्व अर्थिक पतपुरवठा करणा-या संस्था चालु राहतील.
१८. अॅटो/ चारचाकी वाहनांमध्ये वाहनचालक व इतर दोन प्रवाशांना प्रवास करण्यास परवानगी असेल. दुचाकी वाहनांवर एकाच व्यक्तीस प्रवासास परवानगी राहील.
१९. बांधकाम / रस्ते / इतर विकास कामे चालु राहतील. बांधकाम करणा-या व्यक्तींनी बांधकाम सुरु करतेवेळी कामावरील मजुरांच्या यादीसह मुख्याधिकारी, नगरपरिषद / ग्रामसेवक, ग्रामपंचायत यांना कळविणे आवश्यक आहे. मजुरांची वैध परवानगी /पासशिवाय आंतरजिल्हा वाहतूक करता येणार नाही.
२०. कोणत्याही व्यक्तीला वैध परवानगी / पासशिवाय जिल्हयात येता येणार नाही. जिल्हयात बाहेरील व्यक्ती आली तर नागरीकांनी तात्काळ जिल्हा नियंत्रण कक्षास ०२४७२-२२५६१८ या क्रमांकावर कळविणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

या आदेशाची अंमलबजावणी होत असलेबाबत खात्री करुन त्याबाबतचा दैनंदिन अहवाल पोलिस उपअधिक्षक (गृह) उस्मानाबाद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.) जि. प. उस्मानाबाद, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन उस्मानाबाद, जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्रशासन जि. का. उस्मानाबाद, सर्व Incident Commander तथा उपविभागीय दंडाधिकारी, सर्व Incident Commander तथा तालुका दंडाधिकारी , सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सर्व मुख्याधिकारी नगर परिषद/नगरपंचायत, सर्व ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जिल्हा उस्मानाबाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२० चे नियम ११ नुसार भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश दिनांक १७ मे, २०२० पर्यंत लागु राहील.

सदर आदेश दिनाक ०४/०५/२०२० रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रतिलिपी, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
२. पोलिस अधिक्षक, उस्मानाबाद यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
४. जिल्हा शल्य चिकीत्सक, उस्मानाबाद
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. उस्मानाबाद
६. जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र.जि.का. उस्मानाबाद
७. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
८. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.पं./स्वच्छता व पाणीपुरवठा जि.प. उस्मानाबाद
९. उपविभागीय दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१०. तालुका दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
११. गट विकास अधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१२. मुख्याधिकारी, नगर पालिका, उस्मानाबाद, तुळजापूर, नळदुर्ग, उमरगा, लोहारा, मुरुम, भुम, परंडा, वाशी , कळंब यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

4/5/20
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned with CamScanner